**महाराष्ट्र शासन**
**वेतनपथक (उच्च शिक्षण)**
**पुणे विभाग, पुणे**
**१७ डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१**
Web - www.jdhepune.info Email - payunit@jdhepune.info

फोन नं. ०२०/२६१२७८३३, २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०/२६०५१६३२

क्रमांक- तासिका - २०१९/२०१९-२०/०९/वेतनपथक, पुणे दिनांक - ११ डिसेंबर, २०१९

प्रति,

प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य, विधी,
शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये.

**विषय – तासिका तत्वावरील अधिव्याख्यात्यांची माहिती सादर करणेबाबत.**

सन २०१९-२० या आर्थिक वर्षामध्ये आपल्या महाविद्यालयामध्ये तासिका तत्वावर नियुक्त केलेल्या शिक्षक कर्मचा-यांचे मानधन अदा करावयाचे आहे. त्यासाठी माहे जून, २०१९ ते नोव्हेंबर, २०१९ या कालावधीतील आपले प्रस्ताव माहे डिसेंबर, २०१९ चे वेतन देयक ज्या दिवशी व ठिकाणी सादर करण्याबाबत कळविलेले आहे त्याच ठिकाणी व दिनांकास सोबत जोडलेल्या विवरणपत्रामध्ये आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह सादर करण्यात यावेत. सदरहू प्रस्ताव सादर करण्यापूर्वी खाली नमूद केलेल्या सूचना लक्षात घ्याव्यात.

१. आपल्या महाविद्यालयाची माहिती तयार करतांना महिनानिहाय तयार करण्यात यावी.

२. तासिका तत्वावर नियुक्त करण्यासाठी सहसंचालक (उच्च शिक्षण) पुणे विभाग, पुणे यांनी दिलेल्या ना-हरकत प्रमाणपत्राची प्रत प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

३. तासिका तत्वावर कर्मचारी नियुक्त करण्यासाठी दिलेल्या जाहिरातीची प्रत प्रस्तावासोबत जोडण्यात यावी.

४. आपल्या महाविद्यालयातील ज्या कर्मचा-यांची नियुक्ती तासिका तत्वावर करण्यात आलेली आहे त्यांना दिलेल्या नियुक्तीचे आदेश व रुजू अहवालाची प्रत जोडणे आवश्यक आहे.

५. नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचा-याचे नियुक्तीस आपले महाविद्यालय ज्या अकृषी विद्यापीठाशी संलग्नीत आहे त्यांनी आपल्या महाविद्यालयामध्ये तासिका तत्वावर नुियक्त केलेल्या कर्मचा-याचे नियुक्ती संदर्भात दिलेल्या मान्यतेची प्रत जोडणे आवश्यक आहे.

६. तासिका तत्वावर नियुक्त केलेल्या कर्मचा-याने रुजू होते वेळी तासिका तत्वावरील नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपातील नियुक्त असल्याने त्यास नियमित सेवेचे कोणतेही हक्क प्राप्त होत नाहीत, त्यामुळे भविष्यात सेवेत कायम करण्याची मागणी/नियमित सेवेच्या कोणत्याही हक्काची मागणी करणार नाही, तसेच त्यास एकावेळी एकाच महाविद्यालयात काम करता येईल, असे रु.१००/- च्य स्टॅम्प पेपरवर हमीपत्र प्रस्तावासोबत जोडण्यात यावे.

**सही/-**
(डॉ. संजय जगताप)
सहसंचालक (उच्च शिक्षण),
पुणे विभाग, पुणे

**विवरणपत्र १**
**तासिका तत्वावर नियुक्त करण्यात आलेल्या शिक्षक कर्मचा-यांना देय असलेली रक्कम दर्शविणारे विवरणपत्र**

**Name of the College -** **College Code -** **Htesevaarth id –**

| अ. क्र. | विषय | सहसंचालक (उ. शि.) पुणे यांनी मान्यता दिलेल्या शिक्षकांची संख्या | तासिका तत्वावर नियुक्त शिक्षकाचे नांव | महिना | सैध्दांतिक | | | प्रात्यक्षिक | | | एकूण देय रक्कम रु. (९+१२) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | घेतलेल्या तासिकांची संख्या | दर प्रति तास रु. | एकूण देय रक्कम रु. | घेतलेल्या प्रात्यक्षिकांची संख्या | दर प्रति तास रु. | एकूण देय रक्कम रु. | |
| १ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

प्राचार्य
महाविद्यालयाचे नांव